रयत शिक्षण संस्थेचे,

" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद " –कर्मवीर
स्थापना १९५४

# सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज,

कला, विज्ञान व वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ)
विद्यानगर, कराड –पीन ४१५ १२४
जि. सातारा (महाराष्ट्र) पो. बॉ. नं. ३
दूरध्वनी कार्यालय : ७२३४६
निवास : ७२७९४
(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित)

संस्थापक :
पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील डी. लिट.
प्राचार्य :- ई. जी. निकम M. A.


---

संदर्भ क्र. २६६ /९८–९९.    दिनांक : ३/६/१९९८

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की श्री. राजेंद्र यशवंत जाधव हा स. गा. म. महाविद्यालयाच्या एम. फिल ( मराठी ) केंद्राचा नियमित विद्यार्थी असून त्याने कादंबरीकार श्री. ना. पेंडसे यांच्या तुंबाडचे खोत चा चिकित्सक अभ्यास प्रबंधिकेव्दारे केला आहे. त्याला या कॉलेजच्या प्राध्यापिका डॉ. सुमन पाटील यांनी मार्गदर्शन केले आहे. तरी त्याच्या प्रबंधिकेस एम. फिल परीक्षेसाठी समावेश व्हावा अशी मी शिफारस करतो.

विभागप्रमुख,
मराठी विभाग,
स. गा. म. कॉलेज, कराड.

प्राचार्य,
स. गा. म. कॉलेज, कराड.

# -- प्रमाणपत्र --

प्रमाणित करण्यात येते की, श्री राजेंद्र यशवंत जाधव यांनी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. या पदवीसाठी सादर केलेला **" कादंबरीकार श्री.ना. पेंडसे यांच्या 'तुंबाडचे खोत' चा चिकित्सक अभ्यास"** या प्रबंधिकेसाठी केलेले सर्व संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. प्रबंधिका लेखनास ज्या संदर्भ साहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे, त्याचा आवश्यक तेथे यथोचित निर्देश केलेला आहे. परिशिष्टात आवश्यक त्या साधनांची सूची दिलेली आहे.

श्री राजेंद्र यशवंत जाधव यांनी ही प्रबंधिका स्वतंत्ररित्या लिहीली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयातील एम्.फिल. पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

कराड

दिनांक : २०।६।'९८

सुमन पाटील.

**(प्रा.डॉ. सुमन राजाराम पाटील)**

मार्गदर्शक.

# -प्रतिज्ञापत्र-

'' **कादंबरीकार श्री.ना. पेंडसे यांच्या 'तुंबाडचे खोत' चा चिकित्सक अभ्यास**'' या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. पदवी परीक्षेसाठी लिहीली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

हे.(पाडळी)

दिनांक : २२।६।९८

रा.य.जाधव.

**(राजेंद्र यशवंत जाधव)**

अभ्यासक.

## – ऋणनिर्देश –

मराठी विषयाच्या एम.फिल. पदवीसाठी "कादंबरीकार श्री. ना. पेंडसे यांच्या 'तुंबाडचे खोत' चा चिकित्सक अभ्यास" ही लघुप्रबंधिका शिवाजी विद्यापीठास सादर करताना मला अत्यानंद होत आहे. ही लघुप्रबंधिका लिहून पूर्ण करीत असताना मला ज्यांनी ज्यांनी आपले अनमोल क्षण मार्गदर्शनासाठी खर्च केले त्यांच्या ऋणनिर्देशनातून उतराई होणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो.

या शोधकार्यात सतत मार्गदर्शन करणाऱ्या व योग्य दिशा देणाऱ्या विद्याव्यासंगी प्रा. डॉ. सुमन राजाराम पाटील, स.गा.म. महाविद्यालय, कराड यांच्या ऋणाईत राहण्यात मी धन्य समजतो.

तसेच माझ्या संशोधन कार्यासाठी प्राचार्य ई.जी. निकम, स.गा.म. महाविद्यालय, कराड, डॉ. वि.रा. तोडकर कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर, डॉ. कन्हैय्या कुंदप, प्रा. सौ. सुर्यमाला जाधव, प्रा. सौ. शोभना रैनाक, प्रा. सौ. सरलादेवी निकम, प्रा. बी.पी. पाटील, डॉ. संभाजी पाटणे, प्रा. मोहन शिंदे तसेच ग्रंथपाल प्रा. भोसले स.गा.म. महाविद्यालय, कराड यांचे सहकार्य व प्रेरणा यामुळे ही प्रबंधिका पूर्णत्वास गेली.

स.गा.म. महाविद्यालय, ग्रंथालय कराड, मौज प्रकाशन गृह, मुंबई, तसेच प्रबंधिका लिहिताना सहकार्य करणारे अन्य जनार्दन कुर्लेकर, माणिक पाटील, राजेंद्र राक्षे, अधिक, राजाराम, कु. सविता, वंदना, मनिषा, मेधा, दादाराम साळुंखे तसेच माझे कुटुंबीय आई, बंधू यांच्या प्रेरणा लाभल्याने माझे ध्येय पूर्णत्वास गेले. त्यांचाही मी ऋणी आहे.

ही प्रबंधिका वेळेत सुबक व आकर्षक टंकलेखन करणाऱ्या ज्योती इले. टायपींग सेंटर, कराडच्या सौ. नांदेडकर तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचा मी ऋणी आहे.

हे. पाडळी

दिनांक – २२/६/९८

(राजेंद्र यशवंत जाधव)

अभ्यासक.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## – अ नु क्र म णि का –


| अ.नं. | विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| | भूमिका | – 1 - 2 |
| प्रकरण 1 ले | श्री.ना. पेंडसे यांच्या वाड्.मयाचा थोडक्यात आढावा | -- 3 - 46 |
| प्रकरण 2 रे | ग्रामीण, प्रादेशिक कादंबरी म्हणून 'तुंबाडचे खोत' या कादंबरीचा स्थूल परिचय | -- 47 - 60 |
| प्रकरण 3 रे | 'तुंबाडचे खोत' या कादंबरीतील समाजजीवन, कुटुंब जीवन, रूढी, परंपरा, श्रद्धा यांच्या अनुरोधाने चिकित्सा | -- 61 - 78 |
| प्रकरण 4 थे | 'तुंबाडचे खोत' या कादंबरीतील व्यक्ती चित्रणांचा सूक्ष्म अभ्यास | -- 79 - 107 |
| प्रकरण 5 वे | 'तुंबाडचे खोत' या कादंबरीतील निसर्ग व भाषा आणि इतर वाड्.मयीन निकषांचा अभ्यास | -- 108 - 119 |
| प्रकरण 6 वे | समालोचन, निष्कर्ष | -- 120 - 123 |
| | परिशिष्टे : | |
| | 1) संदर्भ ग्रंथ सूची | -- |


–000–

## – भू मि का –

मराठी भाषेस लिखित स्वरूप बाराव्या शतकात प्राप्त झाले असले तरी तिच्या उन्नतीचा कालखंड एकोणिसाव्या शतकास मानावा लागतो. कारण हस्तलिखिताकडून जाणारा प्रवाह मुद्रणापर्यंत पोहचण्याचा हा कालखंड तर आहेच परंतु याचे सारे श्रेय दुर्दैवाने पाश्चात्यांना द्यावे लागते. कारण त्यांनी आपले उदार व उदात्त धोरणाने शिक्षण प्रसारास प्राधान्य दिले. त्यांचा आदर्श म्हणून आपणही काहीतरी करावे हा विचार भारतीय माणसांच्या मनात आला व अंतःप्रेरणेने जागे होवून "ज्ञानगंगेचा विकास" करण्याकडे तत्कालीन समाज सुधारकांचे लक्ष केंद्रीत झाले. त्यात प्रामुख्याने महात्मा फुले, महर्षी शिंदे, आगरकर, गो.ह.देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज यांनी समाज सुधारणेचे व शिक्षण देण्याचे कार्य केले.

इंग्रजी साहित्याचे भाषांतर होवून रूपांतरित साहित्याला भरती आली. त्याच पार्श्वभूमीवर अनेक प्रकारचे स्वतंत्र सात्यि निर्माण होण्यास प्रारंभ झाला. त्यामध्ये अद्‌भुत, सामाजिक, वास्तव, ऐतिहासिक, प्रबोधानात्मक अशा विषयावर साहित्य लिहिले गेले. त्यात प्रामुख्याने कादंबरी हा प्रकार सर्वात लोकप्रिय ठरला. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अद्‌भुतरम्य, सामाजिक, ऐतिहासिक लेखनाप्रमाणेच ग्रामीण समाज स्थितीचे प्रदेशवार समाजाचे अंतरंग व त्यांच्या परंपरागत रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि दैनंदिन जीवनात सामोरे जावे लागणाऱ्या विविध घटकांचे वास्तवदर्शी चित्रण करणारा श्री.ना. पेंडसे सारखा लेखक उदयास आला. त्यांनी आपल्या लेखणीतून हिंदू-मुस्लीम संघर्षावरील 'एल्गार' या प्रादेशिक कादंबरी क्षेत्रात प्रवेश केला, तेथून पुढे खळखळणाऱ्या पाण्यास जशी उतारावर गती यावी तसे पेंडशांच्या लेखनास गती येवून, तुंबाडच्या खोतांची मिरासदारी सांगणारी समृद्ध अशी कलाकृती निर्माण झाली.

'तुंबाडचे खोत' ही एक संशोधनपर कादंबरी कादंबरीच्या आकारावरूनच तिच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलत जातो. आत्तापर्यंत सर्वांनी या विषयाकडे दुर्लक्ष केले. यामध्ये संशोधनासारखे भरपू काही आहे. एका संस्कृतीचा, एका गावाचा, एका घराण्याचा, परिसराचा हा अभ्यास आहे.

समाजातील चढ उताराकडे पाहण्याचा श्री.ना. पेंडसेंच्या दूरदृष्टीचा हेवा वाटावा अशी ही कादंबरी या हेव्यापोटीच हा विषय संशोधनासाठी घ्यावा हे मनाशी पक्के केले. समाज कशा पद्धतीने आपल्या जीवनातील सुखदुःखांचा सामना करतो याचा प्रत्यक्ष अनुभव 'तुंबाडचे खोत' या

कादंबरी वाचनातून आला. स्वतःच्या जीवनालाही त्यातून कलाटणी मिळाली. त्यामुळेच कादंबरीच्या अंतरंगात जाता आले.

श्री.ना. पेंडसे सारख्या विद्वान, लेखक, साहित्यिक व्यक्तिमत्वाचा अभ्यास संशोधनाच्या निमित्ताने केला असला तरी त्यांच्या साहित्याची अफाट व वैभवसंपन्न शैलीचा अभ्यास करताना तो परिपूर्ण होतो की नाही ही साशंकता मनात होती. केवळ त्याच भितीने परिश्रम घेवून माझ्या वैयक्तिक पातळीवर मी भरारी मारण्याचा केलेला अल्पसा प्रयत्न.

–000–